साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–भोजराज पुंडलिक तांदडे
वय ४८ वर्ष, व्यवसाय–शेती.
राह.सिर्सी, तह.उमरेड, जि.नागपुर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी समन्स पत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर मला माहीती नाही. सहीला **निशानी क्र.१४** देण्यात आला. पोलिसांनी मला घटनास्थळावर बोलवले नव्हते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. पोलिसांनी मला पंचनामा वाचून दाखविला नव्हता सहीपुरता **निशानी क्र.१५** देण्यात आला.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/०५/२०२१ रोजी पंचनामा करणेकामी हजर राहण्यासाठी समन्स पत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलिसांनी रेतीचोरीचा पंचनामा केला होता तसेच माझ्यासमक्ष एक लाल रंगाचा ट्रॅक्टर व गौण खनिज रेती असा मुद्देमाल जप्त केला होता व त्याचा पंचनामा माझ्यासमक्ष तयार करण्यात आला व मला वाचुन दाखविला व माझे फोटो काढले तसेच माझ्यासमक्ष चतुर्सिमा नोंदविल्या होत्या व त्यानंतर मी त्यावर सही केली होती. आता मला माझ्या बयाणातील **अधोरेखांकित भाग अ** वाचुन दाखविण्यात आला तो पोलिसांनी बरोबर लिहीला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.एम.आर.धांडे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०१.०२.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड